TITLE-CODE:- MAHMAR52789

# आपला मराठी टाइम्स

संपादक : अनिल राजाराम पवार     कार्यकारी संपादक: मुकेश आर्मा देवेंद्र     APLA MARATHI TIMES

वर्ष : १ ● अंक : ३५ ● साप्ताहिक ● मुंबई ● भाषा : मराठी ● सोमवार : २६ ऑगस्ट ते १ सप्टेंबर २०२४ ● पृष्ठ - ८ ● मुल्य : ६ रुपये

## तीन कोटींच्या फिरत्या आरोग्य दवाखान्याचा वार्षिक देखभाल खर्च १३८ कोटी ! ७६ फिरत्या दवाखान्यांसाठी १० वर्षात लागणार २००० कोटी

**मुंबई** : सुमारे अडीच ते तीन कोटी रुपयांची ७६ आलिशान वाहने घेऊन त्याचा फिरता दवाखाना करण्याचा उद्योग ही उधळपट्टी असून आरोग्य विभागाला आर्थिकदृष्ट्या हे परवडणारे नसल्याचे आरोग्य विभागातील डॉक्टरांचे म्हणणे आहे. या एका आलिशान वाहनासाठी डॉक्टर,तंत्रज्ञ, परिचारिका व अन्य कर्मचारी तसेच देखभालीसाठी वार्षिक ११ कोटी म्हणजेच ७६ गाड्यांसाठी सुमारे १३८ ते १४० कोटी रुपये खर्च येणार आहे. किमान १० वर्षे हा फिरता दवाखाना चालवायचा झाल्यास २००० कोटींपेक्षा जास्त खर्च येणार असून हा निधी आणायचा कुठून असा प्रश्न आरोग्य विभागापुढे निर्माण झाला आहे. राज्याच्या ग्रामीण भागात पुरेशी आरोग्य व्यवस्था आहे. ३६४ ग्रामीण रुग्णालये, ९५ उपजिल्हा रुग्णालये तसेच १,९१३ प्राथमिक आरोग्य केंद्रे रुग्णांवरील उपचारासाठी सज्ज असताना तीन कोटींच्या या आलिशान फिरत्या दवाखान्याची आवश्यकता काय असा सवाल वित्त विभागाने केला आहे. या तीन कोटींच्या वाहान खरेदीच्या प्रस्तावावरून अलीकडेच मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात शाब्दिक चकामक झाली होती. वित्त विभागाने हा प्रस्ताव अव्यवहार्य असल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी या तीन कोटीच्या वाहन खरेदीवर जी लेखी भूमिका मांडली आहे ते पाहाता हा प्रस्ताव आरोग्य विभागाचा नसल्याचे स्पष्ट होते. तानाजी सावंत यांच्या म्हणण्यानुसार सदर वाहन खरेदीचा प्रस्ताव हा मुख्यमंत्री कार्यालयाकडून आरोग्य विभागाला सादर करण्यात आला आहे. वित्त व विधि विभागाच्या मतानुसार यावर कार्यवाही व्हावी, अशी लेखी भूमिका आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी घेतली आहे.आरोग्य विभागाने अशा प्रकारच्या फिरत्या दवाखान्याच्या खेरदीचा कोणताही प्रस्ताव मांडला नसल्याचे आरोग्य विभागातील सूत्रांचे म्हणणे आहे. तीन कोटींच्या या वाहनरुपी फिरत्या दवाखान्याच्या




किमतीत तीन मर्सिडिज गाड्या वा हृदयविकारावरील उपचारासाठीची कॅथलॅब घेता येऊ शकते असे वित्त विभागाच्या एका ज्येष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. प्रामुख्याने ग्रामीण व दुर्गम भागात रुग्णांना रुग्णालयापर्यंत पोहोचविण्यासाठी रुग्णवाहिका ज्यात ऑक्सिजन व अन्य आवश्यक उपकरणे असले तरी पुरसे असते. अशी व्यवस्था आरोग्य विभागाकडे आहे. अशावेळी तीन कोटीचे एक वाहान ज्यात सुमारे ६९ लाख रुपयांची अत्याधुनिक उपकरणे बसविली जाणार आहेत त्यांचा नेमका उपयोग कोणाला होणार आहे, असा सवालही उपस्थित केला जात आहे. या तीन कोटी रुपयांच्या एका आलिशान वाहानाची किंमत एक कोटी ९० लाख इतकी असून या वाहानात ६९ लाख रुपयांची अत्याधुनिक उपकरणे बसविण्यात येणार आहेत. यात पेसमेकर व मॉनिटरसह डिफेब्रिलेटर ज्यांची किंमत साडेपाच लाख रुपये, स्वयंचलित आयव्हीडी मशीन ज्याची किंमत १६ लाख रुपये, ११ लाख रुपयांचे एक्स-रे मशिन, १२ लाखाचे पोर्टेबल ब्रेस्ट कॅन्सर स्क्रिनिंग मशिन, १५ लाखांचे अल्ट्रासाऊंड मशिन, तीन लाखांचे ऑटो रिफ्रेक्टोमीटर, साडेतीन लाखांची पोर्टेबल मोबाईल लॅब, १० लाखांचा मल्टी पॅरामीटर मॉनिटर ईसीजीसह आदी ६९ लाख रुपयांहून अधिक किमतीची उपकरणे या फिरत्या दवाखान्यात असणार आहे. मुख्यमंत्री कार्यालयाकडून आलेल्या व आरोग्य सचिव नवीन सोना यांनी सादर केलेल्या या प्रस्तावात एवढे उच्च तंत्र व उपकरणे असलेल्या या एका फिरत्या दवाखान्यासाठी तीन डॉक्टर जे या उपकरणांच्या चाचण्यांचे अहवाल अभ्यासून उपचार करू शकतात तसेच तंत्रज्ञ , परिचारिका , वाहान चालक, पेट्रोल व देखभाल यासाठी दरमहा किमान १५ ते २० लाखांचा खर्च अपेक्षित असल्याचे नमूद केले आहे. कूण ७६ वाहने खरेदीचा प्रस्ताव असून यासाठी डॉक्टर आदींचा वार्षिक खर्च किमान १३८ कोटी रुपये अपेक्षित धरण्यात आला आहे. एवढी महागडे वाहनरुपी फिरता दवाखाना किमान १० वर्षे चालवायचा झाल्यास वाहनांची देखभाल व डॉक्टर आदींच्या पगारासाठी २००० कोटींचा खर्च अपेक्षित असून हा खर्च कोण करणार हा कळीचा मुद्दा आहे. वित्त विभागाकडे सादर करण्यात आलेल्या या वाहान खरेदी प्रस्तावात सदर ७६ वाहाने ही मुख्यमंत्री आपत्कालीन निधीत करोना काळातील शिल्लक असलेल्या ४०० कोटींच्या निधीतून खरेदी करण्याची भूमिका मांडण्यात आली आहे. वाहान खरेदी व कंट्रोल रुम आणि प्रशासकीय यासाठी सुमारे २५० कोटींचा खर्च आहे. त्यानुसार या गाड्या खरेदी जरी करण्यात आल्या तरी नंतर येणारा डॉक्टर,तंत्रज्ञ, कर्मचारी व देखभालीचा वार्षिक १३८ ते १५० कोटींचा खर्च कोण करणार हा कळीचा मुद्दा आहे. आरोग्य विभागाच्या ज्येष्ठ डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार आधिच आरोग्य विभागात डॉक्टरांची ३० टक्के पदे रिक्त आहेत तर विशेषज्ञ डॉक्टरांची ६१ टक्के पदे रिक्त असताना या आलिशान फिरत्या दवाखान्यांसाठी डॉक्टर आणायचे कोठून हाही एक मुद्दा आहे. मुळातच हा प्रस्ताव अत्यंत अव्यवहार्य असल्याचे वित्त व आरोग्य विभागाच्या डॉक्टरांचे म्हणणे असून ग्रामीण रुग्णालयांमध्ये एमडी फिजिशीयन, भूलतज्ञ तसेच अस्थिशल्यचिकित्सकांची पदे भरली तर गोरगरीब रुग्णांवर वेळेत प्रभावी उपचार करता येतील.

## निवडणुकीच्या कामावरून शिक्षकांमध्ये नाराजीचा सूर

**मुंबई** : परीक्षा आणि इतर महत्त्वाचे शैक्षणिक कामकाज सुरू असताना जवळपास दोन हजारांहून अधिक शिक्षकांना मतदार केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) पदाची जबाबदारी सोपविण्यात येणार आहे. त्यामुळे शिक्षकांमध्ये नाराजीचा सूर उमटू लागला आहे. पालिका क्षेत्रातील अनुदानित आणि पालिका शाळांतील शेकडो शिक्षकांना बीएलओ




म्हणून रुजू होण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र काही ठिकाणी शिक्षक संघटनांनी या आदेशाला विरोध करीत बीएलओचे काम करण्यास नकार दिला आहे. पालिकेच्या शिक्षण खात्यातील एकूण दोन हजार कर्मचारी बीएलओ म्हणून उपलब्ध करून देण्याचे निर्देश पालिका आयुक्त तथा जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी दिले आहेत. परंतु उपशिक्षणाधिकाऱ्यांनी १६ ऑगस्ट रोजी आढावा घेतला. त्यानंतर कमी कर्मचारी निवडणूक कार्यालयायात रूजू झाल्याचे निदर्शनास आले. यासंदर्भात वरिष्ठांनीही नाराजी व्यक्त केली. या वर्षी १५ दिवस आधीच म्हणजे फेब्रुवारी महिन्यात दहावीची परीक्षा सुरू होत आहे. त्यामुळे अध्यापन व तयारीचे वेळापत्रक बदलावे लागणार आहे. त्यामुळे बीएलओचे काम शिक्षकांसाठी सक्तीचे करून विद्यार्थ्यांचे नुकसान करू नये. शिक्षणाधिकाऱ्यांनी याबाबत सक्ती करू नये. -शिवनाथ दराडे, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, मुंबई कार्यवाह

## अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाच्या निषेधार्थ निदर्शने

**मुंबई** : अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण करण्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाविरोधात बुधवारी, २१ ऑगस्ट रोजी विविध दलित संघटनांनी राज्यात बंद पाळून निषेध नोंदवला. मुंबईतील आझाद मैदानात विविध संघटनांकडून धरणे आंदोलन धरण्यात आले होते. ऑल इंडिया पँथर सेनेचे अध्यक्ष दीपक केदार, दलित युथ पँथरचे अध्यक्ष नीलेश मोहिते, स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे सागर संसारे, रिपाइं (राष्ट्रवादी)चे नामदेवराव साबळे, दलित सेनेचे रवी गरुड, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे अध्यक्ष मिलिंद सुर्वे, आंबेडकरवादी भारत मिशनचे दिवाकर शेजवळ यांनी मुंबईत केंद्र सरकारविरोधात निदर्शने केली. आझाद मैदानातील दलित एकता धरणे आंदोलनाचे नेतृत्व बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे अध्यक्ष अ‍ॅड. डॉ. सुरेश माने, रिपाइं (धर्मनिरपेक्ष)चे श्यामदादा गायकवाड, दलित पँथरचे नेते




सुरेश केदारे, सुनील खोब्रागडे यांनी केले. खासदार रामजी गौतम यांच्या नेतृत्वाखाली राज्यात विविध ठिकाणी निदर्शने करण्यात आली. अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण करण्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाचे कर्नाटक आणि तेलगंणा राज्य सरकारांनी जोरदार स्वागत केले आहे. या दोन्ही राज्यात काँग्रेसची सरकारे असून काँग्रेसचा या निर्णयाने दलित विरोधी चेहरा समोर आला आहे, अशी टीका वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केली.

# बहूजन समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक विकासात मविप्र संस्थेचे योगदान मोठे : शिवव्याखते प्रशांत देशमुख - प्रमुख वक्ते

## कर्मवीर रावसाहेब जयंती समाज दिन समारंभात प्रतिपादन

योगेश गोसावी

**नाशिक:** इगतपुरी येथील कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धने महाविद्यालयात कर्मवीर रावसाहेब थोरात यांच्या जयंतीनिमित्त मविप्र 'समाज दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. समारंभाची सुरूवात 'मविप्र' कर्मवीरांना मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पुजन करून मानवंदना देण्यात आली तसेच राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत व समाजगीत गायनाने समारंभाची सुरुवात झाली. या समारंभाचे प्रमुख वक्ते शिवव्याख्यते प्रशांत देशमुख यांनी उपस्थितांना प्रतिपादन करताना छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्याप्रमाणे बहूजन समाजाला बरोबर घेऊन स्वराज्याची गुढी उभारली त्या प्रमाणे मविप्र संस्थेने सर्व समाज घटकांना सोबत घेऊन बहूजन समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक प्रगतीत बहुमोल असे योगदान दिले आहे. याचे सर्व श्रेय मविप्र संस्थेच्या पायाभरणीत योगदान देणा-या कर्मवीरांना जाते त्यात कर्मवीर रावसाहेब थोरात यांनी मविप्र संस्थेची मुहूर्तमेढ करून आज महाराष्ट्रात ही शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवणारी प्रमुख शैक्षणिक संस्था बनली आहे. तर या समारंभाच्या अध्यक्षीय मनोगतात ॲड.संदिप गुळवे यांनी संबोधित करताना असे प्रतिपादन केले की मविप्र संस्थेने कर्मवीरांचा आदर्श समोर ठेऊन या संस्थेचा कायापालट करून इगतपुरीसारख्या आदिवासी तालुक्याच्या ठिकाणी अनेक शैक्षणिक सुख-सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत त्यामुळे ज्ञानाची गंगोत्री आपण जनसामान्यांपर्यंत पोहचवली आहे. तर आपल्या प्रास्ताविक भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.किरण रकिबे यांनी संस्थेच्या ध्येय धोरणानुसार महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात विविध उपक्रम राबवून विद्यार्थांच्या सर्वांगीण विकासाला पोषक असे वातावरण तयार केले असून आज अनेक विद्यार्थी महाविद्यालयात प्रवेश घेऊन विविध क्षेत्रात नावलौकिक प्राप्त करीत आहेत कर्मवीरांना अभिप्रेत असे अनेक उपक्रम गोरगरीब व गरजूवंतासाठी धान्य संकलन मोहीम, आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर, गरजूवंत विद्यार्थांसाठी मोफत गणवेश वाटप , पर्यावरण व जलप्रदूषण जनजागृती असे उपक्रम राबवून महाविद्यालयाने एक आदर्श असे आदिवासी भागातील महाविद्यालय घडविले आहे याचा अभिमान वाटतो याचे सर्व श्रेय कर्मवीरांना व संस्थेच्या व्यवस्थापन मंडळाला जाते.




आजच्या समाजदिन समारंभ प्रसंगी महाविदयालयातील अनेक गुणवंत व शैक्षणिक क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी करणा-या विद्यार्थी व प्राध्यापक बंधू-भगिनींचा सत्कार करण्यात आला. आजच्या समारंभ कार्यक्रम प्रसंगी अनेक मान्यवरांची उपस्थीत होती प्रकाश गव्हाणे, संपतराव मुसळे, पांडुरंग (मामा )शिंदे, विजयजी कडलग, ॲड.दिलीप खातळे, उत्तम गोवर्धने, महेशजी श्रीश्रीमाळ, प्रा.प्रकाश खळे, दिनकर गोसावी, श्रीमती प्रेमलता कापडणीस उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.विष्णू राठोड तर आभारप्रदर्शन प्रा.कन्हैया चौरसिया यांनी केले कार्यक्रम यशस्वीतेसाठी अनेक शिक्षक-शिक्षकेत्तर सेवकांनी प्रयत्न केले.

# निवडणुक आयोगाने स्वायत्तता अबाधित ठेवून सर्वसामान्यामध्ये निवडणुक प्रक्रियेवर विश्वास संपादन करावा-श्यामभाऊ कदम राज्य सहसचिव आप महाराष्ट्र

नवीमुंबई (गुरुनाथ भोईर): सध्याचे देशातील हुकूमशाही सदृश्य वातावरण आणि एकंदरीत निवडणुक प्रक्रियेचा विचार केल्यास निवडणुक आयोग खरोखरीच स्वायत्त संस्था आहे ?की सत्ताधाऱ्यांच्या बाजूने झुकून काम करीत आहे ?असे मत सर्वसामान्यांचे बनत आहे. निवडणूक आयोगाने स्वायत्तता अबाधित ठेवून सर्वसामान्यामध्ये निवडणुक प्रक्रियेवर विश्वास संपादन करावा असे श्याम भाऊ कदम आप महाराष्ट्र सहसचिव ह्यांनी राज्याच्या निवडणुक आयुक्त महाराष्ट्र ह्यांना ह्याच विषयावरील वेगवेगळ्या संदर्भासहित निवेदनाद्वारे पत्रात देऊन अशी नम्र विनंती करण्यात आली असून ह्याबाबत पहिला संदर्भ म्हणजे दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या महाराष्ट्रातील विविध स्थानिक लोकाधिकार संस्थांच्या निवडणुका ज्यामध्ये एप्रिल २०२० पासून प्रलंबित असलेली नवीमुंबई महानगरपालिका निवडणुक पण आली.ह्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाचा कुठल्याही परिस्थितीत स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका घ्या असा आदेश असताना सुध्दा वेगवेगळी कारणे पुढे करून प्रभाग संरचनेत वारंवार बदल करून आयोग वेळकाढू धोरण अवलंबित आहे आणि सत्ताधार्यांस अनुकूल जनमत तयार होण्याची वाट बघत आहे ;असा स्पष्ट आरोप सर्वसामान्यांकडून होत असून दुसरा संदर्भ म्हणजे लवकरच अपेक्षित असलेली पण निवडणुक आयोगाने शुक्रवार १६ ऑगस्ट २०२४ रोजी पत्रकार परिषद घेऊन पुढे ढकललेली महाराष्ट्र विधानसभेची निवडणुक. वास्तविक पाहता ही महाराष्ट्र विधानसभा निवडणुक मुदत संपणार्या जम्मू-काश्मीर, हरियाणा आणि झारखंड विधानसभा बरोबरच होणे अपेक्षित होती. पण आयोगाने फक्त जम्मू-काश्मीर आणि हरियाणा राज्याचेच निवडणुक वेळापत्रक जाहीर केले आहे.ह्यावरून सर्व सामान्यांच्या मनात तीन प्रश्न येतात.पहिला प्रश्न म्हणजे लवकरच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना महाराष्ट्रात मिळालेल्या सपशेल अपयशाच्या पार्श्वभूमीवर विधानसभा निवडणुकीला सामोरे जाण्याचा आत्मविश्वास सत्ताधाऱ्यांना नसल्याने, वातावरण निर्मिती करण्यासाठी,सत्ताधारी अनुकूल असे वेळकाढू धोरण आयोग स्वीकारत आहे का ? दुसरा प्रश्न म्हणजे, नोव्हेंबरमध्ये महाराष्ट्र विधानसभेची मुदत संपल्यावर सत्ताधाऱ्यांचा महाराष्ट्रात राष्ट्रपती शासन आणण्याचा डाव तर नाही ना ?तिसरा प्रश्न म्हणजे ,निवडणुक आयोग तर,फक्त चार राज्यांच्या फक्त विधानसभा निवडणुकांपूर्वी एकदम घेण्यास असमर्थ असताना प्रधानमंत्र्यांनी केलेली ONE NATION ONE ELECTION' ची घोषणा नेहमीप्रमाणे केवळ जुमला समजायचा का ? ह्याशिवाय तिसरा संदर्भ म्हणजे एकाच जिल्ह्यात ३ वर्षपेक्षा अधिक काळ कार्यरत असलेल्या निवडणुकीशी संबंधित अधिकाऱ्याच्या निवडणुकी आधी बदल्या करणेबाबत. निवडणुक कामात थेट सहभागी असणाऱ्या अधिकाऱ्यांची आणि ज्यांनी ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत सध्याच्या जिल्ह्यात ३ वर्षे पूर्ण केलेली आहेत त्यांच्या बदल्या निवडणुकीपूर्वी करणे राज्य सरकारला बंधनकारक आहे.पण येथे सुध्दा आयोग सत्ताधार्यांना झुकते माप देत नियम मोडत सत्ताधाऱ्यांकडून त्यांच्या मर्जीतल्या काही अधिकाऱ्यांच्या बदल्या न करण्याच्या धोरणाला समर्थन देत आहे असे दिसून येत आहे.त्या त्या शहराच्या निवडणुक प्रक्रियेत त्या शहराच्या पालिका आयुक्तांची भुमिका ही अत्यंत महत्वाची ठरत असते.ह्या वस्तुस्थितीची नोंद घेऊन कार्यवाही करणे हे निवडणुका पारदर्शक होण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.ह्या बाबतीत राज्य निवडणूक आयोगाने नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त आणि इतर अधिकाऱ्यांच्या जिल्ह्यामधील एकूण कार्यकाळची पडताळणी करावी आणि ३ वर्षपेक्षा अधिक काळ एकाच जिल्ह्यात पूर्ण केलेल्या निवडणुक संबंधित अधिकाऱ्यांची निवडणुक आयोगाच्या निष्कर्षानुसार बदली करण्याचे निर्देश राज्य सरकारला द्यावेत.

# विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर विकासकामांचा धडाका; १० मतदारसंघांसाठी ५०० कोटी खर्च

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शासनाकडून पुढच्या १५ दिवसांत अनेक प्रकल्पांचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. शहर विभागाच्या १० मतदारसंघांसाठी ५०० कोटी खर्च करण्यात येणार असून, यामधील जवळपास ३५० कोटी पालिका प्रशासनकडून, तर १५० कोटी जिल्हा विकास नियोजन समितीकडून खर्च करण्यात येणार आहेत. शहर विभागाचे पालकमंत्री दीपक केसरकर यांनी शहरातील ६२ विविध प्रकल्पांचा आढावा शुक्रवारी पालिका मुख्यालयात पालिका आयुक्त आणि अतिरिक्त आयुक्त, अधिकारी यांच्यासोबत घेतला. मुंबई देशाची आर्थिक राजधानी असून, ती राहण्यास उत्तम आणि सुविधा युक्त असावी,असा आमचा प्रयत्न असल्याचे केसरकर म्हणाले. पालिकेच्या भूमिगत बाजाराची संकल्पना अंमलात आणण्यासाठी त्यांनी सूचना दिल्या होत्या. त्यासाठी अधिकाऱ्यांनी काही ठिकाणांचे सर्वेक्षणही केले आहे. मात्र, अद्याप भूमिगत बाजारांसाठी काहीच हालचाल न झाल्याने यासाठी संबंधित अधिकाऱ्यांविरोधात कारवाईच्या सूचना केसरकर यांनी दिल्या आहेत. भूमिगत बाजारांसाठी पालिकेकडून दादर टीटी, कोतवाल गार्डन या ठिकाणांची निवड केली होती. याशिवाय बीपीटीच्या जागेवर आपला दवाखानाच्या प्रस्तावासाठी बीपीटीलाच प्लॅनिंग अथॉरिटी म्हणून नेमण्यात आले होते. मात्र, यावर काहीच कार्यवाही न झाल्याने आता



पालकमंत्र्यांनी पालिकेला प्लॅनिंग ऑथॉरिटी म्हणून नियुक्त केले असून, पुढील कार्यवाहीच्या सूचना केल्या आहेत. मुंबादेवी ते क्रॉफर्ड मार्केट आणि कॉटन मार्केट ते मुंबादेवी परिसर हा झोपडपट्ट्या आणि अतिक्रमणाने वेढला गेला आहे. हा परिसर पोलिसांच्या मदतीने पुढच्या ४ दिवसांत अतिक्रमणमुक्त करण्याची हमी केसरकर यांनी दिली.

फॅशन स्ट्रीटचा कायापालट–

१) मुंबादेवी, सिद्धिविनायक मंदिर, महालक्ष्मी, हाजी अली दर्गा यांचा विकास करणार.

२) फॅशन स्ट्रीटचा चेहरा मोहरा बदलणार, सर्व व्यावसायिकांना समान आकाराच्या जागा आणि स्टॉल्स देणार.

३) फुटपाथवर राहणाऱ्यांसाठी एसी शेल्टर होम्सची व्यवस्था करणार.

४) हाजी अली येथील सबवेमध्ये फाइव्ह स्टार एसी स्वच्छतागृहे.

राणीच्या बागेत मत्स्यालय–

१) प्रभादेवी ते माहीम जिओ ट्यूब्स तंत्रज्ञान बसवणार.

२) पालिका शाळांतील रंगरंगोटी हाती घेण्यात येईल.

३) महाराष्ट्र दालनाचे सुशोभीकरण.

४) राणीच्या बागेत मत्स्यालयाचे काम सुरू करणार.

५) मुंबई पोलिसांच्या वसाहतींच्या दुरुस्त्या हाती घेणार.

६) गोविंदासाठी प्रत्येक वॉर्डात सुरक्षेची काळजी घेण्याच्या सूचना.

७) वरळी कोळीवाड्यात बॅटरी ऑपरेटेड कारसह बॅटरी ऑपरेटेड म्बिलन्सची व्यवस्था करणार.

८) कामगारांसाठी स्वतंत्र केंद्र स्थापन करणार.

९) क्रॉफर्ड मार्केटमधील हातगाड्यांच्या जागी बॅटरी ऑपरेटेड गाड्यांची सुविधा देणार.

## सरकारच्या निषेधार्थ महिला संतप्त; लाडकी बहीण योजनेचे पैसे केले परत



**भाईंदर:** महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या निषेधार्थ भाईंदर मधील महिलांनी तहसीलदार कार्यालयात जाऊन लाडकी बहीण योजनेचे पैसे परत केले. आम्हाला पैसे नको तर सुरक्षा हवी असे या महिलांनी शासनाला ठणकावले. या महिलांची कृती चर्चेचा विषय बनली आहे. बदलापूर येथे अल्पवयीन मुलींवर शाळेत झालेल्या लैंगिक अत्याचाराचे तीव्र पडसाद राज्यभर उमटू लागले आहेत. सर्वसामान्य नागरिकांमध्ये संताप पसरला असून शासनाविरोधात रोष दिसून येतोय. ठिकठिकाणी सामाजिक संस्थासह राजकीय पक्षाकडून आंदोलन करून निषेध नोंदवला जात आहे. बुधवारी मीरा भाईंदर मध्ये शासनाचा अनोख्या पध्दतीने निषेध करण्यात आला.काही महिलांनी भाईंदर पश्चिम येथील अप्पर तहसीलदार कार्यालयात गेल्या आणि लाडक्या बहीण योजनेतून मिळालेले पैसे परत केले. याबाबतची चित्रफित तयार करून त्यांनी ही माहिती दिली. आम्हाला अशा पैशांची गरज नाही. शासनाने आम्हाला केवळ शासनाने सुरक्षा द्यावी असे त्यांनी सांगितले. एकीकडे सरकार मुलींना सुरक्षा देऊ शकत नाही आणि दुसरीकडे लाडकी बहिण योजना देऊन भुलवले जात असल्याचा आरोप च्या महिलांनी केला. या महिलांच्या कृतीचे समाज माध्यमावर कौतुक होत आहे. दुपारी महिला कार्यालयात आल्या तेव्हा तहसीलदार उपस्थित नव्हते. आपल्या कार्यालयात कोणीही आले नसल्याचा दावा अप्पर तहसीलदार दिनेश गौड यांनी केला आहे.

## मुंबईत ठाकरेच मोठा भाऊ, जास्त जागा देण्याची काँग्रेस-राष्ट्रवादीची तयारी, पण...

**मुंबई :** मुंबईत ठाकरेंची शिवसेना मोठा भाऊ असेल त्यावर आम्हाला आक्षेप घेण्याचं काही कारण नाही. जे सत्य आहेत ते आहे. जागा किती लढवणार याबाबत काही चर्चाच झाली नाही. जागावाटप झाल्यावर चिठ्ठी तुमच्या हातात देऊ. आजच्या बैठकीत काही राजकीय चर्चा झाली. त्यासोबत बदलापूर आणि इतर भागातील बलात्कार प्रकरणावर चर्चा झाली अशी माहिती राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी दिली. मुंबईत महाविकास आघाडीची बैठक झाली त्यानंतर ते बोलत होते. यावेळी जितेंद्र आव्हाड म्हणाले की, लोकसभेत शिवसेना ठाकरे गट मोठा भाऊ होता. जर मुंबईबाबत बोलायचे झाले तर शिवसेना मोठा भाऊच राहिल असं त्यांनीस सांगितले. तर सूत्रांच्या हवाल्याने ठाकरे गटाने महाविकास आघाडीच्या बैठकीत मुंबईतील ३६ पैकी २०-२२ जागांवर दावा केल्याची माहिती आहे. अणुशक्तीनगरच्या जागेवर तिन्ही पक्षांनी दावा केला आहे. २०१९ च्या निकालात भाजपानं १६ जागा,



शिवसेनेने १४ जागा, काँग्रेसनं ४, राष्ट्रवादी आणि समाजवादी पक्षानं प्रत्येकी एक जागा जिंकली होती. २०२४ च्या जागावाटपात शिवसेना ठाकरे गटाला मुंबईत सर्वाधिक जागा हव्यात कारण लोकसभा निवडणुकीत ठाकरेंचे ३, काँग्रेस १, भाजपा आणि शिवसेना शिंदे गटाचे प्रत्येकी १ खासदार निवडून आलेत. टीव्ही ९ ने ही बातमी दिली. अणुशक्तीनगर मतदारसंघावर मविआच्या तिन्ही पक्षांचा दावा आहे. याठिकाणी विद्यमान राष्ट्रवादी आमदार नवाब मलिक हे अजित पवार गटात आहेत. शरद पवार गटाचे रवींद्र पवार यांच्यासाठी ही जागा राष्ट्रवादीला हवी. तर वांद्रे पूर्व जागेवर शिवसेना ठाकरे गटाने दावा सांगितला आहे. त्याठिकाणी वरूण सरदेसाई हे इच्छुक आहेत. याठिकाणी विद्यमान आमदार झिशान सिद्दीकी हे काँग्रेसचे असून ते पक्षात नाराज आहेत. जर वांद्रे पूर्व जागा आम्हाला सोडली तर चांदिवली विधानसभेची जागा आम्ही काँग्रेसला सोडू असा ठाकरे गटाचा प्रस्ताव आहे. चांदिवली विधानसभेत शिवसेना आमदार दिलीप लांडे आहेत जे शिंदे गटासोबत आहेत. त्याठिकाणी काँग्रेसचे नसीम खान इच्छुक आहेत. दरम्यान, बदलापूर प्रकरणानंतर जनतेच्या मनात रोष आहे त्यावर चर्चा झाली. हा राजकीय रोष नसून सामाजिक रोष आहे. राजकीय हेतूनं आंदोलन नाही. जनता रस्त्यावर उतरत आहे त्याचा अर्थ स्पष्ट आहे विद्रोहाची आग लागली आहे. बदलापूर प्रकरणी किती जणांवर गुन्हा नोंदवणार आहे? पुढील आठवड्यात अख्खं बदलापूर हे पोलीस स्टेशनला जाणार, तुम्ही आमच्यावर गुन्हा दाखल करा. तुम्ही लोकांच्या संवेदनाची परीक्षा पाहू नका. माणूस गरीब असू शकतो लाचार नाही. लढवय्या तर कायम असतो. आपल्या इथं मुलींवर बलात्कार होतो. गुन्हा नोंदवला जात नाही. राजकीय हस्तक्षेपामुळे गुन्हा घेतला जात नाही हे सगळं असताना महिला घरी शांत बसतील का? आमच्या मुलाबाळांचे काय होणार याची चिंता महाराष्ट्रातील पालकांना पडली आहे अशी टीका जितेंद्र आव्हाडांनी केली.

# डोंबिवलीत दोन अल्पवयीन मुलींचा विनयभंग करणाऱ्या नराधमाला नाशिकमधून अटक



**डोंबिवली** : डोंबिवली पूर्वेतील सागाव भागातील दोन अल्पवयीन मुलींचा विनयभंग करणाऱ्या एका नराधमाला मानपाडा पोलिसांनी नाशिक जिल्ह्यातील सटाणा तालुक्यातील एका गावातून अटक केली आहे. गेल्या चौदा दिवसांपासून आरोपी फरार होता. मानपाडा पोलिसांची विशेष पथकांनी अटकेची कारवाई केली. प्रवीण पाटील असे अटक आरोपीचे नाव आहे. काही दिवसापूर्वी दोन अल्पवयीन मुली घराच्या परिसरात खेळत होत्या. त्यांना पाहून आरोपी प्रवीण पाटील विशिष्ट हावभाव करून अश्लिल चाळे करत होता. प्रवीण करत असलेले कृत्य पाहून दोन्ही मुली घाबरल्या. त्यांनी आरडाओरडा सुरू केला. परिसरातील नागरिक तेथे जमा झाल्याने मारहाण होण्याच्या भीतीने प्रवीण तेथून पळून गेला. पीडित मुलींनी घरात हा प्रकार सांगितला. मुलींच्या पालकांनी याप्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली होती. गुन्हा दाखल झाल्यानंतर प्रवीण चोरट्या मार्गाने नाशिक जिल्ह्यात पळून गेला होता. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कदबाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांची विशेष पथके त्याचा शोध घेत होती. तांत्रिक माहितीच्या आधारे प्रवीण सटाणा तालुक्यातील एका गावात लपून बसला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी आरोपी राहत असलेल्या गाव परिसरात पाळत ठेवली होती. प्रवीण गावात असल्याची खात्री पटल्यावर पोलिसांनी रात्रीच्या वेळेत त्याच्या घरावर छापा टाकून त्याला अटक केली.त्याला कल्याण न्यायालयात पोलिसांनी हजर केल्यावर न्यायालयाने पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. गेल्या काही दिवसांपासून डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर परिसरात विनयभंग, बलात्काराचे प्रकार वाढल्याने शासनाने या भागात कर्तव्य कठोर पोलीस अधिकारी नियुक्त करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

# नायगाव पोलिसांकडून मुख्याध्यापकांना सुरक्षिततेचे धडे




**वसई** : बदलापूर येथील एका शाळेत मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचार घटनेचे पडसाद राज्यभर उमटले आहेत. अशा घटना शाळेत व महाविद्यालयात घडू नये यासाठी नायगाव पोलिसांनी बुधवारी पोलीस ठाण्याच्या अंतर्गत येत असलेल्या विद्यालयातील मुख्याध्यापकांची बैठक घेतली. यात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेविषयीच्या सूचना पोलिसांनी केल्या आहेत. बदलापूर येथील शाळेत मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचार घटनेमुळे पुन्हा एकदा शालेय सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शालेय स्तरावरून उपाययोजना होणे गरजेचे आहे. यासाठी नायगाव पोलिसांनी मुख्याध्यापक यांची तातडीने बैठक घेतली. यात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, मुलींच्या स्वच्छतागृहाची साफसफाई करण्याकरिता महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे, विशाखा समिती स्थापन करणे, शाळेतील कर्मचारी यांचे चरित्र पडताळणी करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. तसेच शाळेतील बसवरील वाहक व चालक यांचेही चारित्र्य पडताळणी करण्याबाबत सूचना देऊन शक्यतो महिला वाहकाची नेमणूक करावी, तक्रार पेटी ठेवणे, मुलांचे समुपदेशन करणे अशा सूचना नायगाव पोलिसांनी केल्या आहेत. सहायक पोलीस आयुक्त नवनाथ घोगरे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक रमेश भामे, पोलीस निरीक्षक सागर टिळेकर, मंगेश अंधारे, सहायक पोलीस निरीक्षक बलराम पालकर, पोलीस हवालदार प्रकाश आवारे यासह ३५ ते ४० शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते.

बदलापूर सारखी दुर्घटना अन्य शाळेत घडू नये यासाठी नायगाव पोलीस ठाण्याच्या अंतर्गत येत असलेल्या शाळांमधील मुख्याध्यापक यांची बैठक घेतली. मुलांच्या सुरक्षिततेसाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत सूचना केल्या आहेत. -रमेश भामे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक नायगाव पोलीस ठाणे

# तानसा जलवाहिनी फुटली; अंधेरी ते दादर आणि भांडुपला फटका



**मुंबई** : मुंबईला पाणीपुरवठा करणारी तानसा जलवाहिनी शुक्रवारी दुपारी पाऊणच्या सुमारास फुटली. जलवाहिनी फुटल्यामुळे मोठ्या प्रमाणावर पाण्याचे फवारे उडत होते. मोठ्या प्रमाणावर पाणी वाहून गेले. पाणीगळती थांबवण्याचे प्रयत्न सुरू असून जलवाहिनी फुटल्यामुळे अंधेरी ते दादर परिसरातील पाणीपुरवठ्यावर परिणाम झाला. जलवाहिनीच्या दुरुस्तीच्या कामामुळे शनिवारपर्यंत या सर्व भागात पाणीपुरवठा बंद राहील किंवा कमी दाबाने होईल. पवई परिसरात आरे वसाहतीमधील गौतमनगर विभागात शुक्रवारी दुपारी पाऊणच्या सुमारास तानसा मुख्य जलवाहिनी फुटली. १,८०० मिमी व्यासाची मुख्य जलवाहिनी फुटल्यामुळे मोठ्या प्रमाणावर पाण्याचे फवारे उडत होते. प्रचंड दाबाने पाण्याचे फवारे आजूबाजूच्या परिसरात, वस्त्यांवर आदळत होते. त्यामुळे परिसरात पाणीच पाणी झाले. मुख्य जलवाहिनी फुटल्यामुळे अंधेरी, जोगेश्वरी, विलेपार्लेचा पूर्व भाग, सांताक्रूझ, वांद्रे, खार परिसर, बेहराम पाडा, वांद्रे रेल्वे टर्मिनस, धारावी, दादर, माहीम येथील पाणीपुरवठ्यावर परिणाम होणार आहे.

दरम्यान, जल अभियंता खात्यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि जलवाहिनीतून होणाऱ्या पाण्याच्या गळतीवर पूर्णपणे नियंत्रण मिळविले. त्यानंतर दुरुस्तीचे कामदेखील युद्धपातळीवर सुरू करण्यात आले. दुरुस्तीचे काम चोवीस तास चालणार असून त्यामुळे शनिवारपर्यंत अंधेरी ते दादर आणि भांडुपमधील पाणीपुरवठ्यावर परिणाम होणार आहे. काही ठिकाणी कमी दाबाने पाणीपुरवठा होईल, तर काही ठिकाणचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. या परिसरातील नागरिकांनी काटकसरीने पाणी वापरावे व महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

**पाण्याच्या प्रवाहामुळे घरांचे नुकसान**

जलवाहिनी फुटल्यामुळे प्रचंड दाबाने पाणी आजूबाजूच्या वसाहतींमधील घरांवर फेकले जात होते. त्यामुळे या परिसरातील किमान दहा ते बारा घरांचे नुकसान झाले. घरांचे छप्पर उडाले, सामान अस्ताव्यस्त झाले, तसेच अनेक घरांमध्ये पाणी शिरले.

# धो-धो पावसात ठाकरे गटाचे आंदोलन




**मुंबई** : बदलापूरात शाळकरी मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडीतर्फे महाराष्ट्र बंद ची हाक देण्यात आली होती. परंतु उच्च न्यायालयाने बंद करण्यास मनाई केल्यानंतर महाराष्ट्र बंद मागे घेण्यात आला. मात्र, राज्यभर मूक आंदोलन करण्याचा निर्णय मविआच्या नेत्यांनी घेतला आहे. त्या अनुषंगाने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून दादरमधील शिवसेना भवनजवळ आंदोलन केले. त्यावेळी सरकारविरोधात तीव्र निदर्शने करण्यात आली. या आंदोलनादरम्यान मुसळधार पावसानेही हजेरी लावली. यावेळी अनेक कार्यकर्ते धो-धो पावसात भिजत घोषणाबाजी करत होते. डोक्याला काळ्या फिती बांधून आणि हाती काळे झेंडे घेऊन धो -धो पावसात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, आमदार आदित्य ठाकरे, रश्मी ठाकरे, खासदार संजय राऊत, अनिल देसाई, शिवसेनेचे माजी महापौर, आमदार, खासदार, नेते व कार्यकर्ते हे आंदोलनात सहभागी झाले होते. मुसळधार पाऊस आणि जोरदार वाऱ्याची पर्वा न करता कार्यकर्त्यांनी शिवसेना भवनचा परिसर दणाणून सोडला. चिमुरडीला न्याय द्या; नाहीतर खुर्च्या खाली करा, नराधमांना फाशी झालीच पाहिजे, मिंधे सरकार हाय हाय, या सरकारचे करायचे काय; खाली डोके वर पाय अशा घोषणा कार्यकर्त्यांकडून देण्यात येत होत्या.

# एकाच घरातील दोन चिमुकल्यांचा मृत्यू, एकाची प्रकृती स्थिर; अन्नातून विषबाधा झाल्याचा संशय

**पालघर :** डहाणू तालुक्यातील पावन येथील डूकले कुटुंबातील तीन मुलांची प्रकृती १९ ऑगस्ट रोजी रक्षाबंधनाच्या दिवशी खराब झाली असून यातील दोघांचा मृत्यू झाला असून एका मुलाची प्रकृती सध्या स्थिर आहे. जेवणातून विषबाधा झाल्यामुळे मुलांची प्रकृती खालावल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत असून शव विच्छेदन अहवाल मिळाल्यानंतर मृत्यूचे नेमके कारण समोर येणार आहे. पावन येथे राहणाऱ्या डूकले कुटुंबाचे घर म्हणजे एक छोटीशी झोपडी असून यामध्ये विद्युत सुविधा देखील उपलब्ध नाही. रक्षाबंधनाच्या दिवशी कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर ७ वाजता दरम्यान कुटुंब दिव्याच्या उजेडात जेवण करून झोपले होते. दरम्यान ८.३० वाजताच्या दरम्यान नरेश डूकले यांच्या दीपक वय ९, विशाल वय ७ आणि सूरज वय ३ वर्ष या तीनही मुलांना उलट्या आणि जुलाबाचा त्रास होऊ लागला. रात्री उशिरा पर्यंत मुलांचा त्रास कमी झाला नसून मध्यरात्रीच्या सुमारास मुलांना खूप जास्त प्रमाणात त्रास सुरू झाला होता. यामुळे नरेश आणि त्यांच्या पत्नीने आपल्या आप्तेष्टांना मदतीने रात्री २ वाजताच्या सुमारास मुलांना उपचारासाठी कासा उपजिल्हा रुग्णालयात घेऊन जात असताना विशाल याचा घरीच मृत्यू झाला असून दीपक आणि सूरज यांना कासा उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. येथे मुलांवर प्राथमिक उपचार करून त्यांना पुढील उपचारासाठी नजीकच्या केंद्रशासित प्रदेशातील सेलवास येथील रुग्णालयात पाठविण्यात आले. रुग्णालयात नेत असतानाच दीपक डूकले याचा दुर्दैवी मृत्यु झाला असून तीन वर्षीय सूरजची प्रकृती सध्या



स्थिर आहे. एकाच दिवसात कुटुंबातील दोन मुलांचा मृत्यू झाल्यामुळे डूकले कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला असून परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे. चिमुकल्यांचा मृत्यूचे नेमके कारण काय असावे याची चर्चा सध्या परिसरात सुरू असून घरात विद्युत व्यवस्था नसल्यामुळे जेवण बनवताना त्यामध्ये काही तरी पडले असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. यामुळे मुलांना जेवणातून विषबाधा झाल्यामुळे वेळीच उपचार न मिळाल्यामुळे चिमुकल्यांना जीवाला मुकावे लागल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. चिमुकल्या विशालच्या मृतदेहाचे शवविच्छेदन कासा उपजिल्हा रुग्णालयात करण्यात आले असून दीपकचे शव विच्छेदन सेलवास येथील रुग्णालयात करण्यात आले आहे. दोघांचाही शवविच्छेदन अहवाल अजूनही समोर आला नसून अहवाल मिळाल्यानंतर मृत्यूचे नेमके कारण समोर येणार असल्याचे सांगितले जात आहे. रक्षाबंधनाच्या दुसऱ्या दिवशी पहाटे मुलांना उपचारासाठी कासा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांनतर दुसऱ्या दिवशी नरेश डूकले यांना देखील उलटी आणि ताप सारखे त्रास होऊ लागल्यामुळे त्यांना २१ ऑगस्ट रोजी रुग्णालयात दाखल करण्यात आले असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे कुटुंबीयांची प्रकृती बिघडण्यामागे जेवणातून विषबाधा झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत असून शव विच्छेदन अहवाल मिळाल्यानंतर मुख्य कारण समोर येणार असल्याचे सांगितले जात आहे.

प्रथम रुग्णालयात आलेल्या दोनही मुलांना होणारा त्रास एकसमान असून दुसऱ्या दिवशी त्यांच्या वडिलांना देखील तसाच त्रास होत असल्यामुळे त्यांनाही दाखल करण्यात आले होते. त्यामुळे कुटुंबाला जेवणातून विषबाधा झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. मृतांचे शव विच्छेदनाचे अहवाल मिळाल्यानंतर मृत्यूचे नेमके कारण समोर येणार आहे.

डॉ. सुनील वाघमारे, वैद्यकीय अधिकारी उपजिल्हा रुग्णालय कासा

# आयर्लंड वकिलातीमधील अधिकाऱ्याची सायबर फसवणूक, आरोपीला हरियाणातून अटक

**मुंबई :** वांद्रे-कुर्ला संकुल (बीकेसी) परिसरातील आयर्लंड वकिलातीमधील अधिकाऱ्याची सुमारे सात लाख रुपयांची ऑनलाईन फसवणूक करणाऱ्या आरोपीला हरियाणातून अटक करण्यात सांताक्रुझ पोलिसांना यश आले. सुनील जगदीश गर्ग असे अटक आरोपीचे नाव असून तो सायबर फसवणूक करणाऱ्या आरोपींना बँक खाते उपलब्ध करण्यात मदत करीत होता. आरोपीने आतापर्यंत चार बँक खाती आरोपींना उपलब्ध केल्याचे तपासात उघड झाले आहे. ४९ वर्षांचे तक्रारदार सांताक्रुज येथे वास्तव्यास असून ते आयर्लंड वाणिज्य वकिलातीमध्ये व्यवस्थापक म्हणून काम करतात. त्यांना १७ मे रोजी मोहनकुमार नावाच्या एका व्यक्तीने दूरध्वनी करून कुरियर कंपनीतून बोलत असल्याचे सांगितले. त्यांच्या नावाने तैवान येथे एक पार्सल पाठविण्यात आले होते. त्यात पाच पारपत्र, तीन क्रेडिटकार्ड, दोनशे ग्रॅम एमडी अमली पदार्थ, कपडे, लॅपटॉप आणि रोख ३५ हजार रुपये होते. ते पार्सल कस्टम विभागाने जप्त केले असून त्याचा तपास गुन्हे शाखा करीत आहे, असे त्याने सांगितले. त्यानंतर त्यांना विक्रम सिंग नावाच्या गुन्हे शाखेतील एका तोतया पोलीस उपनिरीक्षकाने




दूरध्वनी केला. तुमच्या आधारकार्डचा मोठ्या प्रमाणात गैरवापर झाला आहे. फसवणुकीसाठी आधारकार्डचा वापर करून अज्ञात व्यक्तीने चार विविध बँक खाती उघडल्याचे सिंगने त्यांना सांगितले. त्यानंतर आरोपींनी त्यांना विविध खात्यात पैसे पाठविण्यास सांगितले. त्यामुळे त्यांनी त्याला सुमारे सात लाख रुपये हस्तांतरित केले. ही रक्कम त्यांच्या बँक खात्यात पुन्हा पाठविली जाणार होती. पहिल्यांदाच त्यांच्यासोबत मुंबई पोलीस दलासह सायबर पोलीस आणि सेंट्रल ब्युरो ऑफ इन्वेस्टिगेशनमधील अधिकारी बोलत होते. त्यामुळे ते प्रचंड घाबरले होते. सात लाख रुपये पाठविल्यानंतर त्यांना आणखी २५ लाख रुपये भरण्यास सांगण्यात आले. या अधिकाऱ्यांकडून सतत पैशांची मागणी होत असल्याने तक्रारदारांना संशय आला. त्यांनी याप्रकरणी सांताक्रुझ पोलिसांकडे तक्रार केली, त्यानुसार पोलिसांनी माहिती तंत्रज्ञान प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला. बँक खात्याच्या माध्यमातून तपास केला असता सुनील गर्गचे बँक खाते गैरव्यवहारासाठी वापरण्यात आल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पोलिसांनी त्याला हरियाणातून अटक केली. सुनीलचा पूर्वी पैसे हस्तांतरित करण्याचा व्यवसाय होता. या व्यवसायात त्याला प्रचंड नुकसान झाले होते. त्यानंतर तो सायबर फसवणूक करणाऱ्या भामट्यांच्या संपर्कात आला व त्यांना बँकेत खाते उघडण्यासाठी मदत करू लागला. त्यासाठी तो काही रक्कम कमिशन म्हणून घेत होता. बँक खाती उघडण्यासाठी बनावट कागदपत्रांचा वापर करण्यात येत होता, असे तपासात उघड झाले. पोलीस याप्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

# आगावू भाडे जमा करण्याच्या निर्णयाचा झोपु योजनांना फटका ! प्राधिकरणाकडून निर्णय मागे घेण्यास नकार

**मुंबई :** दोन वर्षांचे आगावू भाडे झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाकडे जमा करण्याच्या निर्णयामुळे आता अनेक झोपु योजनांची कामे ठप्प झाली आहेत. प्राधिकरणाने या निर्णयाचा फेरविचार करावा, या मागणीसाठी विकासकांच्या संघटनेने उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. याआधी विकासकांकडून वर्षभराचे भाडे झोपडीवासीयांच्या खात्यात जमा केले जात होते. परंतु आता दोन वर्षांचे भाडे प्राधिकरणाकडे जमा करावे लागत आहे. भाडे जोपर्यंत जमा केले जात नाही तोपर्यंत विक्री घटकाचे काम करण्यावर विकासकाला बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे रोकडसुलभता निर्माण होत नाही, असे विकासकांचे म्हणणे आहे. झोपु योजनांना बँका वा वित्तीय कंपन्या कर्ज देत नसल्यामुळे मोठा फटका बसत असल्याचे या विकासकांचे म्हणणे आहे. विविध योजनांमध्ये झोपडीवासीयांचे सुमारे हजार कोटींहून अधिक भाडे थकल्याने उच्च न्यायालयाने प्राधिकरणाला चांगलेच फटकारले होते. भाडे थकबाकी वसुलीसाठी प्राधिकरणाने तात्काळ उपाययोजना करावी, असे आदेशही न्यायालयाने दिले होते. त्यानंतर गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात प्राधिकरणाने २१० क्रमांकाचे परिपत्रक जारी केले होते. या परिपत्रकानुसार, झोपडीवासीयांचे दोन वर्षांचे आगावू भाडे देणे आणि त्यापुढील वर्षासाठी भाड्याचे धनादेश देणे बंधनकारक केले होते. या अटीची पूर्तता केल्यानंतर झोपु योजनेतील विक्री घटकाला परवानगी दिली जात होती.

## नावात बदल

जुने नाव विनोद महेश गोविस मी माझ्या नावात बदल केलेला आहे या पुढे मी विनोद महेश गवस या नावाने ओळखला जाईन तसेच माझी बायको सौ.गीता विनोद गोविस (जुने नाव) हि या पुढे सौ. गीता विनोद गवस या नावाने ओळखली जाईल तसेच माझी मुले १. कु.विवेक विनोद गोविस (जुने नाव) हा या पुढे कु. विवेक विनोद गवस तसेच २.कु.दानियल विनोद गोविस (जुने नाव) हा या पुढे कु.विपुल विनोद गवस तसेच ३. कु.एरॉन विनोद गोविस (जुने नाव) हा या पुढे कु.अरुण विनोद गवस या नावाने ओळखले जातील याची नोंद घावी.

## संपादकीय

संपादक : अनिल राजाराम पवार

# उपाय केले, पण शाळांवर जबाबदारी ढकलायला नको

बदलापूरच्या शाळेत दोन चिमुकलींवरील अत्याचाराच्या घटनेनंतर जे काही घडत गेले, अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी सरकारने जे उपाय जाहीर केले त्यांना या उपचाराचे स्वरूप प्राप्त होणार नाही, हे पाहावे लागेल. राज्यातील सरकारी आणि खासगी शाळांत सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे सरकारने बंधनकारक केले आहे. अत्याचाराच्या घटनेमुळे जनता संतप्त रस्त्यावर उतरल्यानंतर दोषींवरील कारवाईपासून प्रतिबंधासाठी सरकारकडून काही वरवरच्या उपाययोजनांची जंत्री जाहीर करण्यापर्यंतच्या साऱ्या प्रक्रियेला आपल्याकडे निव्वळ उपचाराचे स्वरूप आले आहे. जनक्षोभ कमी झाला, की बहुतेक प्रतिबंधात्मक उपाय कागदावरच राहतात, असा आजवरचा अनुभव आहे. बदलापूरच्या शाळेत दोन चिमुकलींवरील अत्याचाराच्या घटनेनंतर जे काही घडत गेले, अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी सरकारने जे उपाय जाहीर केले त्यांना या उपचाराचे स्वरूप प्राप्त होणार नाही, हे पाहावे लागेल. राज्यातील सरकारी आणि खासगी शाळांत सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे सरकारने बंधनकारक केले आहे. त्यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात आली असून, त्याचे पालन न करणाऱ्या शाळांचे अनुदान रोखण्याचा इशारा देण्यात आला आहे. शाळांना आता सीसीटीव्ही कॅमेरे लावावे लागतील, ठरावीक कालावधीने त्यातील चित्रफीती पाहाव्या लागतील आणि काही आक्षेपार्ह आढळल्यास दोषींवर कायदेशीर कारवाई करावी लागेल. शाळांमध्ये नियंत्रण कक्ष स्थापण्यापासून तक्रार पेट्या बसविण्यापर्यंतच्या सूचनाही आहेत. शाळा व्यवस्थापन समिती आणि मुख्याध्यापक यांच्यावरील जबाबदारी यामुळे वाढली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत सात जणांची आढावा समितीही नेमण्यात आली आहे. याबाबत आपल्याला जे करायचे आहे ते आपण केले; आता पुढील जबाबदारी शाळांची असा यात एकूण आविर्भाव दिसतो. या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी सुरुवातीला आग्रहही धरला जाईल. शाळांनी सीसीटीव्ही लावले का, नियंत्रण कक्षाद्वारे चित्रफीतींची नियमित पाहणी होते का, तक्रार पेट्या बसवून त्यांतील तक्रारींची दखल घेतली जाते का याचा पाठपुरावा पहिले काही महिने होईलही; परंतु हळूहळू हे थांबेल, असा आजवरचा अनुभव सांगतो. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी सरकारने सुचविलेले उपाय योग्य आहेत; परंतु विद्यार्थ्यांच्या व्यापक सुरक्षेपासून शाळांमधील सुविधांपर्यंत सरकार किती संवेदनशील आहे, हा खरा प्रश्न आहे. आपल्याकडील अनेक शाळांच्या इमारती मोडकळीस आल्या आहेत, कित्येक शाळांत योग्य स्वच्छतागृहेही नाहीत; त्यांपैकी काही ठिकाणी विजेची सोय नाही. राज्यातील ९० टक्क्यांहून अधिक सरकारी शाळांत पिण्याच्या पाण्याची, स्वच्छतागृहांची सोय असल्याची आकडेवारी असली, तरी प्रत्यक्षात तशी स्थिती नाही, असे जाणकार म्हणतात. ही आकडेवारी मान्य केली, तरी आठ–दहा टक्के शाळांत या सोयी नाहीत हे वास्तव उरतेच. तिथे कधी सोय होणार? शिक्षणाच्या प्रक्रियेत सरकारचा हस्तक्षेप वाढला असला, तरी प्रत्यक्ष शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण कमी होत आहे. त्यामुळे शाळा विकासनिधीपासून वंचित राहत आहेत. शाळेची कामे लोकांकडून मदतनिधी घेऊन करण्याची भूमिका सरकार घेत आहे. आता तर खासगी कंपन्यांनी शाळा दत्तक घ्याव्यात, असा आग्रह होत आहे. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती कंत्राटी पद्धतीने करण्याची भूमिकाही घेण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर सीसीटीव्ही कॅमेरे आणि त्यासाठीचा नियंत्रण कक्ष स्थापण्याचा खर्च शाळांनाच करावा लागेल. अंमलबजावणी झाली की नाही हे पाहण्यासाठी शासकीय अधिकारी कागद फिरविणार आणि काही दिवसांनी अमूक टक्के शाळांनी कॅमेरे बसविले असे जाहीर केले जाईल. थोडक्यात अंमलबजावणीचे कागदी घोडे नाचविले जातील. बदलापूरच्या घटनेनंतर सरकारने वास्तविक विद्यार्थी सुरक्षेचा व्यापक विचार करायला हवा. विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीपासून शाळेतील त्यांच्या सुरक्षेपर्यंत सर्व मुद्द्यांचा विचार व्हायला हवा. सर्व सरकारी आणि अनुदानित शाळांना यासाठी अतिरिक्त निधीही उपलब्ध करून द्यायला हवा. एकीकडे नवीन शिक्षण धोरणाचा दाखला देऊन आनंददायी शिक्षणाची भाषा करायची आणि दुसरीकडे विविध कारणांनी शाळा मुलांसाठी असुरक्षित बनलेल्या वास्तवाकडे दुर्लक्ष करायचे हा दुटप्पीपणा आहे. तो पूर्णपणे थांबला पाहिजे. सर्व मुला–मुलींसाठी शाळा सर्वार्थाने सुरक्षित व्हायला हव्यात आणि तिथे त्यांना आनंदी वातावरणात शिक्षण घेता यायला हवे. या उद्दिष्टाच्या दिशेने जाण्याकरिता आवश्यक पावले पडताना दिसत नाहीत. सध्या ज्या उपाययोजना केल्या जात आहेत, त्या वरवरच्या आणि प्रतिक्रियात्मक आहेत.

# तुम्ही कामाचा सतत ताण घेता का? कसं ओळखाल? जाणून घ्या लक्षणे



अनेक लोक ९ ते ५ नोकरीमुळे त्यांचे वैयक्तिक आयुष्य सुद्धा विसरतात आणि सतत कामामुळे तणावात राहतात. तुम्ही सुद्धा कामाचा स्ट्रेस घेता का? किंवा सतत कामाचे टेन्शन घेता का? कामामुळे तणावात राहण्याचे खालील लक्षणे दिसून येतात. आज आपण त्या लक्षणांविषयी जाणून घेऊ या.

हल्ली दररोजच्या धापवळीच्या आयुष्यात अनेक जण आरोग्याकडे लक्ष देत नाही. नोकरी हा आयुष्याचा भाग आहे पण नोकरी म्हणजे आयुष्य नाही, हे समजून घेणे, खूप महत्त्वाचे आहे. कामाच्या वेळी काम आणि इतर वेळी मनसोक्तपणे आयुष्य जगता आले पाहिजे.

अनेक लोक ९ ते ५ नोकरीमुळे त्यांचे वैयक्तिक आयुष्य सुद्धा विसरतात आणि सतत कामामुळे तणावात राहतात. तुम्ही सुद्धा कामाचा स्ट्रेस घेता का? किंवा सतत कामाचे टेन्शन घेता का? कामामुळे तणावात राहण्याचे खालील लक्षणे दिसून येतात. आज आपण त्या लक्षणांविषयी जाणून घेऊ या.

**कामाविषयी सतत बोलणे**

जरी तुमचे काम सात वाजता संपले असेल तरी तुम्ही तुमच्या मित्रांबरोबर, कुटुंबातील सदस्यांबरोबर तसेच शेजाऱ्यांबरोबर तुमच्या कामाविषयी बोलत असता. ऑफिसमध्ये घडणाऱ्या गोष्टी त्यांच्याबरोबर शेअर करता तसेच मॅनेजर किंवा बॉसविषयी सतत चर्चा करता.

तुमच्या मित्रांना तुमच्या ऑफिसच्या गोष्टी ऐकण्यात रस नसणे

जरी तुमचे मित्र मैत्रिणी तुमच्या ऑफिसमध्ये काम करत नसले तरी त्यांना तुम्ही तुमच्या कामाच्या ठिकाणी घडलेल्या छोट्या छोट्या गोष्टी सांगत असाल तर त्यांना या गोष्टी ऐकण्यात अजिबात रस नसतो.

**सुट्टीच्या दिवशी मेल तपासणे**

कामापासून ब्रेक घेण्यासाठी सुट्टी असते ज्यामुळे आपण स्वत:ला वेळ देऊ शकतो पण सुट्टीच्या दिवशी सुद्धा तुम्ही मेल तपासत असाल, तर हे चुकीचे आहे. तुम्हाला एखादी महत्त्वाची गोष्ट चुकवू नये, म्हणून सतत भीती असते त्यामुळे तुम्ही अपडेट जाणून घेण्याचा प्रयत्न करता.

**इच्छा नसताना ऑफिस वेळेच्या पलीकडे काम करणे**

तुम्हाला अति काम करायची इच्छा नसते. परंतु काही कारणांमुळे तुम्ही बोलत नाही आणि प्रत्येक जण त्याचा फायदा घेत तुमच्यावर काम सोपवतात. इच्छा नसताना तुम्ही ऑफिस वेळेच्या पलीकडे काम करता.

**ऑफिसचे काम घरी करणे**

अनेक जण डेडलाइन पूर्ण करण्याच्या नादात ऑफिसवरून घरी आल्यानंतर पुन्हा काम करतात. जो वेळ कुटुंबाबरोबर घालवणे अपेक्षित असते किंवा स्वत:ला वेळ देणे अपेक्षित असते तेव्हा तुम्ही ऑफिसचे काम करता.

**सुट्टीवर असताना तुम्ही ऑफिसचा ग्रुप बंद ठेवत नाही**

आठवड्याची सुट्टी असो किंवा तुम्ही चार पाच किंवा त्यापेक्षा जास्त दिवस सुट्टीवर असाल तर तुम्ही ऑफिसचे ग्रुप बंद ठेवत नाही आणि त्यामुळे तुम्हाला सतत मेसेज येतात आणि तुम्ही नीट सुट्ट्यांचा आनंद घेऊ शकत नाही.

**सतत ऑफिस पॉलिटिक्सविषयी चर्चा करणे**

जरी तुमचे काम संपले तरी तुम्ही तुमच्या सहकाऱ्यांबरोबर ऑफिस पॉलिटिक्सविषयी चर्चा करता. ऑफीसमध्ये काय घडत आहे, काय सुरू आहे यावर तुमचा वैयक्तिक वेळ घालवता.

# सर्वोच्च न्यायालयातील संधी

सुप्रीम कोर्ट ऑफ इंडिया ज्युनियर कोर्ट अटेंडंट (कुकिंग नोईंग)च्या एकूण ८० पदांची भरती

पदाचे नाव :– ६ज्युनियर कोर्ट अटेंडंट (वेतन श्रेणी-पे–लेव्हल रु. २१,७००, अंदाजे वेतन दरमहा रु. ४६,२१०/–.

पात्रता : १० वी उत्तीर्ण आणि किमान १ वर्ष कालावधीचा कुकिंग/कलिनरी आर्ट्समधील डिप्लोमा. (माजी सैनिक कुकिंग/कॅटरिंग क्षेत्रातील कॉम्पिटंट अथॉरिटीने दिलेले ट्रेड/ कॉम्पिटन्सी सर्टिफिकेट)

अनुभव : प्रतिष्ठित हॉटेल/ रेस्टॉरंट/ शासकीय विभाग/ सरकारी उपक्रम येथील ३ वर्षांचा कुकिंग कामाचा अनुभव.

वयोमर्यादा : (दि. १ ऑगस्ट २०२४ रोजी) १८ ते २७ वर्षे (कमाल वयोमर्यादेत



सूट - इमाव - ३ वर्षे, अजा/ अज -५ वर्षे) (विधवा/ घटस्फोटीत/ कायद्याने विभक्त पुनर्विवाह न केलेल्या महिला- खुला गट- ३५ वर्षे, इमाव- ३८ वर्षे, अजा/अज- ४० वर्षे).

निवड पद्धती : (१) ऑब्जेक्टिव्ह टाईप लेखी परीक्षा (इंग्लिश/ हिंदी भाषेतील प्रश्नपत्रिका) १०० गुणांसाठी (जनरल नॉलेज -३० गुण व कुकिंग कलिनरी आर्ट्स -७० गुण) वेळ ९० मिनिटे. चुकीच्या उत्तरांसाठी गुण वजा केले जाणार नाहीत.

(२) प्रॅक्टिकल ट्रेड स्किल टेस्ट इन कुकिंग -७० गुण.

(३) इंटरव्ह्यू -३० गुण, एकूण २०० गुण. पात्रतेसाठी किमान ६० टक्के गुण मिळविणे आवश्यक. लेखी परीक्षा, स्किल टेस्ट आणि इंटरव्ह्यूच्या तारखा सुप्रीम कोर्टाचे वेबसाईट्वर प्रसिद्ध केल्या जातील. याची सूचना उमेदवारांना एसएमएस आणि ई–मेलद्वारे पाठविली जाईल.

परीक्षा केंद्र : नागपूर, मुंबई, अहमदाबाद, बेंगळूरु, भोपाळ, हैदराबाद इ. एकूण १७ केंद्र. ऑनलाइन अर्जात ३ परीक्षा केंद्रांसाठी पसंतीक्रम द्यावयाचा आहे.

अर्जाचे शुल्क : रु. ४००/–. (अजा/ अज/ दिव्यांग/ माजी सैनिक/ विधवा, घटस्फोटीत, कायद्याने विभक्त पुनर्विवाह न केलेल्या महिला यांना रु. २००/–) ऑनलाइन संकेतस्थळावर दि. १२ सप्टेंबर २०२४ (२४.०० वाजे) पर्यंत करावेत.

# अनैतिक संबंधातून प्रियकराच्या मदतीने पतीची हत्या




**ठाणे :** भिवंडी येथील काल्हेर भागात अनैतिक संबंधातून प्रियकराच्या मदतीने महिलेने तिच्या पतीची हत्या केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी राधा मिश्रा (२५) आणि तिचा प्रियकर अनुभव पांडे (२३) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी अनुभव याला अटक केली आहे. पुरावा नष्ट करण्यासाठी राधा आणि अनुभव या दोघांनी मृतदेह ठाणे खाडीत फेकला होता. परंतु त्या मृतदेहाचा शोध अद्याप लागू शकला नाही. काल्हेर येथील दुर्गेश पार्क परिसरात बलराम मिश्रा (२७) हे त्यांच्या पत्नी राधा हिच्यासोबत वास्तव्यास होते. तर बलराम यांचा मित्र अनुभव हा देखील त्यांच्या सदनिकेसमोरील घरामध्ये वास्तव्यास होता. ७ ऑगस्टला मध्यरात्री अचानक बलराम यांच्या मोबाईलमधून एक संदेश त्यांच्या भावाच्या व्हॉट्सपिवर गेला. त्यामध्ये आम्ही तीन ते चार दिवसांसाठी पुण्याला नातेवाईकांकडे जात असल्याचे म्हटले होते. परंतु पुण्याला त्यांचे कोणीही नातेवाईक नसल्याने बलराम यांच्या भावाला संशय आला. ते बलराम यांच्या घरी गेले. त्यावेळी घराला कुलुप होते. त्यांनी बलराम आणि राधा यांना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतु दोघांचे मोबाईल बंद होते. त्यामुळे बलराम यांच्या भावाने याप्रकरणी बलराम आणि राधा हे बेपत्ता असल्याची तक्रार नारपोली पोलीस ठाण्यात दाखल केली. दरम्यान, घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन नारपोली पोलिसांनी याप्रकरणाचा तपास सुरू केला. पोलिसांनी इमारतीमधील सीसीटीव्ही तपासले असता, अनुभव हा ७ ऑगस्टला मध्यरात्री इमारतीमधील सीसीटीव्ही कॅमेऱ्याची दिशा बदलत असताना आढळून आला. त्यानंतर राधा देखील मोठ्या बॅग भरून बाहेर पडताना दिसली. पोलिसांनी त्यांच्या मोबाईलचे तपशील तपासले. त्यावेळी त्यांनी एक कार चालकाला संपर्क साधल्याचे समोर आले. त्याची चौकशी केली असता, त्याने त्यांना एलटीटी रेल्वे स्थानकात सोडल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी एलटीटी स्थानकात जाऊन चौकशी केली. तेव्हा ते गोरखपुर एक्सप्रेस या रेल्वेगाडीने गेल्याचे समोर आले. पोलिसांचे पथक गोरखपुर येथे गेले. तिथे पोलिसांनी अनुभव याला ताब्यात घेऊन अटक केली. त्याने गुन्ह्याची कबूली दिली आहे. ६ ऑगस्टला रात्री राधा आणि अनुभव यांनी बलराम यांची चाकूने वार करून हत्या केली. त्यानंतर त्यांचा मृतदेह एका बॅगेत भरला. दोघांनीही रात्री ऑनलाईन कार नोंदणी केली. त्याला कशेळी खाडीपर्यंत सोडण्यास सांगितले. कार कशेळी खाडीपर्यंत आल्यानंतर त्यांनी कार चालकाला पैसे दिले. कार चालक काही अंतर पुढे गेल्यानंतर त्यांनी मृतदेह खाडीत फेकून दिला. त्यांनी पुन्हा ऑनलाईन कार नोंदणी करत त्या कारने एलटीटी स्थानक गाठल्याचे तपासात समोर आले आहे. बलराम यांच्या मृतदेहाचा पोलीस शोध घेत आहेत.

# अनाथ आश्रमातील अडीच वर्षीय मुलीला चटके, संचालक अटकेत

**ठाणे :** बदलापूर येथील शाळेमध्ये दोन चिमुकल्यांवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना ताजी असतानाच, भिवंडी येथील अनाथ आश्रमात एका अडीच वर्षांच्या मुलीला चटके देण्यात आल्याचा गंभीर प्रकार उघडकीस




आला आहे. याप्रकरणी भोईवाडा पोलीस ठाण्यात अनाथ आश्रमाचा संचालक दत्ता गायसमुद्रे याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी त्याला अटक केली आहे. पिडीत मुलीचे आई-वडिल भिक्षेकरू आहे. तीन महिन्यांपूर्वी मुलीच्या आजीने तिला धामणकर नाका येथील शोभा अनाथ आश्रम आणले होते. तेव्हापासून ती मुलगी या आश्रमात वास्तव्यास होती. काही दिवसांपूर्वी तिच्या शरीरावर काही जखमा आढळून आल्या होत्या. त्यामुळे तिच्या आजीने तिला ठाण्यातील जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी नेले. उपचारा दरम्यान तिच्या पोटावर, डाव्या कानाच्या मागे, डाव्या डोळ्याच्या बाजूला चटके दिल्याच्या जखमा असल्याचे स्पष्ट झाले. या घटनेनंतर पिडीत मुलीच्या आजीने याप्रकरणी भोईवाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार अनाथ आश्रमाचा संचालक दत्ता गायसुमद्रे याच्याविरोधात भोईवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी त्याला अटक केली.

# लिपिक भरतीत पदवीचा जाच; परीक्षा पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्णची अट रद्द करण्याची मागणी

**मुंबई :** मुंबई महापालिकेत बऱ्याच कालावधीनंतर १,८४६ लिपिक पदांसाठी भरती सुरू झाली असली तरी त्यासाठीच्या अर्जात घातलेल्या शैक्षणिक अटींमुळे नव्या वादाला तोंड फुटण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. अर्जदार उमेदवार हा पदवी परीक्षा पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण असायला हवा, ही अट जाचक ठरणार, असे दिसत आहे. आतापर्यंत २७ हजार उमेदवारांनी अर्ज केले आहेत. संबंधित अटीवर बोट ठेवत अर्ज नाकारले जात आहेत. अर्ज का नाकारला जात आहे याचे पत्रच पालिकेच्या प्रशासकीय विभागाकडून संबंधित उमेदवारांना पाठवले जात आहे. २० ऑगस्टपासून कार्यकारी सहायक (लिपिक) या १,८४६ पदांसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या पदासाठी शैक्षणिक अर्हता, अटी, नियम याची माहिती पालिकेच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. पहिल्या प्रयत्नात पदवी परीक्षा उत्तीर्ण ही अट जाचक असल्याची भावना व्यक्त होत आहे. ज्या उमेदवारांनी शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे जोडली आहेत, त्या कागदपत्रांची संबंधित महाविद्यालयांशी संपर्क साधून पडताळणी केली जात आहे. जे उमेदवार पहिल्या प्रयत्नात पदवी परीक्षा उत्तीर्ण झाले नसतील, त्यांचा अर्ज बाद ठरवून त्यांना याबाबत लेखी कळवले जात आहे. म्युनिसिपल



कर्मचारी कामगार सेनेचे अध्यक्ष बाबा कदम व उपाध्यक्ष डॉ. संजय कांबळे-बापेरकर यांनी जाहिरातीतील जाचक अटी वगळून शुद्धीपत्रक काढण्याची मागणी केली आहे. कार्यकारी सहायक पदासाठी निवड परीक्षा घेतली जाणार असेल तर पदवी परीक्षा पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण असणे, ही अट का ठेवण्यात आली, असा सवाल केला आहे. लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतही अशा अटी ठेवल्या जात नाहीत, याकडे युनियनने प्रशासनाचे लक्ष वेधले. काही विशिष्ट प्रवर्गातील उमेदवारांना टंकलेखन परीक्षा नियुक्तीपासून दोन वर्षांत उत्तीर्ण करण्याची मुभा देण्यात आली आहे. ती सरसकट सर्वच उमेदवारांना देण्यात यावी, अशी मागणी युनियनने केली आहे. अनुकंपा तत्त्वावर किंवा अग्रहक्काने नोकरी मिळविण्याची वेळ येते तेव्हा पहिल्याच प्रयत्नात पदवीधर या अटीमुळे त्यांना कामगार पदासाठीच पात्र ठरविले जाते. पदवी किंवा द्वीपदवीधर असूनही या कर्मचाऱ्यांच्या मुलांना लिपिकपदी नियुक्ती दिली जात नाही, असे युनियनने आयुक्तांना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे.

**आदित्य ठाकरेंचे आयुक्तांना पत्र**

१) पदवीची अट जाचक असून त्यामुळे राज्यातील दोन ते तीन लाख मुला-मुलीना लिपिक पदासाठीचे अर्ज भरता येणार नाहीत.

२) सध्या महाराष्ट्रातील बेरोजगाराची भयावह परिस्थिती लक्षात घेता, या अटीचे पुनर्विचार करावा व अटीत बदल करावा.

३) त्यामुळे अधिकाधिक उमेदवारांना अर्ज करता येईल, अशी मागणी उद्धव सेनेचे आ. आदित्य ठाकरे यांनी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांना लिहिलेल्या पत्रात केली आहे.

# महामार्गावरील महाकाय जाहिरात फलकांचा मुद्दा : अधिकार नसताना परवानगी देणाऱ्या ग्रामपंचायतींवर कारवाई करा, उच्च न्यायालयाचे सरकारला आदेश

**मुंबई :** कोणतेही कायदेशीर अधिकार नसताना ग्रामपंचायतींकडून महाकाय जाहिरात फलकांना परवानगी दिली जात असल्याबाबत उच्च न्यायालयाने कठोर भूमिका घेतली आहे. तसेच, या प्रकारांची गंभीर दखल घ्यावी आणि अशा परवानग्या देण्यापासून सर्व ग्रामपंचायतींना मज्जाव करणारे परिपत्रक काढावे, असे आदेश न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत. महाकाय जाहिरात फलकांना परवानगी देणाऱ्या ग्रामपंचायतींवर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेशही न्यायालयाने सरकारला दिले आहेत. घाटकोपर येथील फलक दुर्घटनेनंतर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) नवी मुंबईतील महामार्गांवर लावण्यात आलेले महाकाय जाहिरात फलक हटवण्याबाबत संबंधित कंपन्यांना नोटिसा बजावल्या होत्या. या नोटिसांविरोधात या कंपन्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. तसेच, संबंधित ग्रामपंचायतींनी जाहिरात फलक लावण्यास परवानगी दिल्याचा दावा केला होता. ग्रामपंचायतींच्या परवानगीमुळे सिडको किंवा नवी मुंबई महापालिकेच्या परवानगीची गरज नसल्याचा युक्तिवादही या कंपन्यांनी न्यायालयात केला होता. न्यायालयाने या कंपन्यांना महाकाय जाहिरात फलक हटवण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर, या कंपन्यांनी जाहिरात फलक हटवण्याची हमी न्यायालयात दिली होती. त्याची दखल घेऊन न्यायालयाने या कंपन्यांना फलक हटवण्यासाठी ऑगस्ट अखेरीपर्यंतची मुदत दिली होती. या याचिकांच्या निमित्ताने ग्रामपंचायतींकडून अशा महाकाय जाहिरात फलकांना बेकायदेशीररीत्या परवानगी दिली जात असल्याच्या मुद्द्याची न्यायालयाने दखल घेतली. महामार्गावर महाकाय जाहिरात फलक लावण्यासाठी ग्रामपंचायतीला परवानगी देण्याचा अधिकार नसल्याचे माहीत असून कंपन्यांनी संबंधित ग्रामपंचायतींची परवानगी घेतली व फलक लावले. ग्रामपंचायतीही त्यांना कोणताही कायदेशीर अधिकार नसताना जाहिरात कंपन्यांना महाकाय फलक लावण्यासाठी परवानगी देत असल्याचे या निमित्ताने उघड झाले आहे, असे न्यायमूर्ती महेश सोनाक आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठाने सरकारला संबंधित ग्रामपंचायतींवर कारवाई करण्याचे आदेश देताना स्पष्ट केले. संबंधित नियोजन अधिकारी देखील हा सगळा प्रकार माहीत असताना फलकांवर कारवाई का करत नाहीत याबाबतही न्यायालयाने हे आदेश देताना आश्चर्य व्यक्त केले. अधिकार नसतानाही महामार्गावर महाकाय जाहिरात फलक लावण्यास परवानगी देणाऱ्या ग्रामपंचायतींच्या कृतीची राज्य सरकारने गांभीर्याने दखल घेण्याची वेळ आहे. म्हणूनच अशा गैरप्रकारांना आळा घालण्याच्या दृष्टीने सरकारने परिपत्रक काढण्याची आवश्यकता आहे, असे न्यायालयाने नमूद केले. त्याचप्रमाणे, हे परिपत्रक काढण्याचे सरकारला आदेश दिले.

# पाच वर्षांत पालिकेने २३६० कोटींची मुदतठेव मोडली, माहिती अधिकारातून बाब उघड

**मुंबई :** मुंबई महापालिकेने गेल्या पाच वर्षांत २३६० कोटींच्या मुदतठेवी कालावधी पूर्ण होण्यापूर्वीच मोडल्या असून त्यात बेस्टला अधिदान देण्यासाठी सहावेळा मुदत ठेव मोडली आहे. तर एमएमआरडीएला निधी देण्यासाठीही मुदतठेवी मोडल्या आहेत. माहिती अधिकारात ही बाब उघडकीस आली आहे. मात्र २०२०-२१ आणि २०२१-२२ या दोन वर्षांत एकदाही मुदतठेवी मोडलेल्या नाहीत. मुंबई महापालिकेच्या सुमारे ८३ हजार कोटींच्या मुदतठेवी विविध बँकांमध्ये आहेत. गेल्या काही वर्षांत विविध प्रकल्पांसाठी या मुदतठेवींचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे या मुदतठेवी कमी झाल्याबाबत टीका होऊ लागली होती. पालिकेच्या विविध विभागांच्या अधिशेष रकमेच्या मुदतठेवी विविध बॅंकांमध्ये आहेत. पालिकेच्या या मुदतठेवीतूनच आस्थापना खर्च व निवृत्त कर्मचाऱ्यांची देणी दिली जात असतात. तसेच विविध विकासकामांसाठी कंत्राटदारांकडून घेतलेल्या अनामत रकमांचा या ठेवीमध्ये समावेश असतो. दरवर्षी या मुदतठेवीमधील कोट्यवधींच्या ठेवी परिणत (मॅच्युअर) होत असतात. तर दरवर्षी नव्याने मुदतठेवी ठेवल्या जातात. मात्र गेल्या पाच वर्षांत मुदतठेवी परिणत होण्याची वाट न बघता मुदतीपूर्वीच ठेवी मोडाव्या लागल्याची बाब उघड झाली आहे. पाच वर्षांत आठ वेळा मुदतठेव मुदतीपूर्व मोडल्या आहेत. २३६० कोटी २० लाख १९ हजार रुपये अशी मोडलेल्या मुदत ठेवींची रक्कम आहे. त्यामध्ये कर्मचाऱ्यांचे, निवृत्ती वेतन धारकांचे ऑगस्ट महिन्यांचे वेतन, निवृत्ती वेतनाचे अधिदान गणेशोत्सव सणापूर्वी २९ ऑगस्ट २०२२ रोजी करण्याचे आदेश राज्य सरकारने दिले होते. त्यामुळे युनियन बॅंक ऑफ इंडियाच्या ६४५,२०,०७,००० रुपयांच्या मुदतठेवी मोडण्यात आल्या होत्या. मुंबई महापालिकेने मागील पाच वर्षांत २३६० कोटींची मुदत ठेव मुदतपूर्व मोडल्याची माहिती आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली यांना मुंबई महापालिकेने दिली आहे.




**एमएमआरडीएला ९४९.५० कोटी**

एमएमआरडीएला अधिदान करण्यासाठी स्टेट बॅंक ऑफ इंडियात जमा असलेली ९४९, ५०, ००,००० रुपयांची मुदत ठेव दिनांक १५ मार्च २०२४ रोजी मोडली. मेट्रोचे जाळे मुंबईत निर्माण करण्यात येत असल्यामुळे या खर्चाचा काही भाग म्हणून एमएमआरडीएने मुंबई महापालिकेकेड तीन हजार कोटींची मागणी केली आहे. या निधीवरून सध्या दोन प्राधिकरणात वाद सुरू आहे.

**बेस्टला अनुदानासाठी सहावेळी मुदतठेव मोडली**

बेस्टला अनुदान देण्यासाठी पालिका प्रशासनाने गेल्या पाच वर्षांत सहा वेळा मुदतठेवी मोडल्या आहेत. मुदतठेवी मोडून बेस्टला ७५७ कोटींचे अनुदान देण्यात आले आहे. बेस्टचा तोटा भरून काढण्यासाठी बेस्टने वेळोवेळी पालिकेकडे अनुदान मागितले होते. त्याकरीता दरवर्षी पालिकेच्या अर्थसंकल्पात तरतूदही केली जाते. मात्र दिवाळी बोनससाठी किंवा राज्य हस्तक्षेपामुळे अनेकदा तरतूदीपेक्षा अधिक अनुदान पालिकेने बेस्टला दिले आहे.

केव्हा किती मुदतठेवी मोडल्या

बेस्टला अनुदान ::२५० कोटी :.ऑगस्ट २०१९

बेस्टला अनुदान::११३ कोटी::ऑगस्ट २०१९

बेस्टला अनुदान :..११५ कोटी:.ऑगस्ट २०१९

बेस्टला अनुदान :..१०० कोटी :.एप्रिल २०२२

बेस्टला अनुदान :.९२ कोटी :.एप्रिल २०२२

बेस्टला अनुदान :.८७ कोटी :.एप्रिल २०२२

पालिका कर्मचाऱ्यांची देणी :६५४ कोटी २० लाख ::ऑगस्ट २०२२

एमएमआरडीएला अधिदान :.९४९ कोटी ५० लाख :.मार्च २०२४









OWNER, PRINTER, PUBLISHER & EDITOR BY ANIL RAJARAM PAWAR PRINTED AT M/S SOMANI PRNITING PRESS, UNIT NO.04, GROUND FLOOR, N.K. INDUSTRIAL ESTATE, OFF AREY ROAD, NEAR PARVASI IND. ESTATE, GATE NO. 2, GOREGAON EAST, MUMBAI-400063, & PUBLISH AT M/81, MARIAMMA NAGAR, WORLI, DR A.B. ROAD,BEHIND NEHRU CENTRE, WORLI MUMBAI - 400018. MAHARASHTRA , Email : amtnewspaper@gmail.com, Title-Code:- MAHMAR52789 , Mob. 9867110318

मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक अनिल राजाराम पवार यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.४, ग्राउंड फ्लोअर, आरे रोड, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेट, गेट नं. २, गोरेगाव (पूर्व) मुंबई - ४०००६३ महाराष्ट्र येथून मुद्रित, एम/८१,मरिम्मा नगरए वरळी, डॉ. ए.बी. रस्ता, नेहरू सेंटरच्या मागे, वरळी,मुंबई ४०००१८, महाराष्ट्र येथून प्रकाशित केले.
मो. ९८६७११०३१८, Email : amtnewspaper@gmail.com, Title-Code:- MAHMAR52789